महाराष्ट्र शासन (कारागृह विभाग)
कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, वर्धा रोड, नागपूर-२०
दुरध्वनी क्र.०७१२-२२४८८४४/२२४८८१३ फॅक्स क्र. ०७१२-२२४८८४४
ई-मेल-dignagpur-mh@gov.in

## निविदा सन २०१९-२०२० ( ऑनलाईन )

कारागृह उपमहानिरीक्षक,पूर्व विभाग, नागपूर-२० यांचे अधीपत्याखाली येत असलेल्या **नागपूर महसूल विभाग परिक्षेत्रातील** १) नागपूर मध्यवर्ती कारागृह, २)भंडारा जिल्हा कारागृह, ३)चंद्रपूर जिल्हा कारागृह व ४) वर्धा जिल्हा कारागृह ५) गडचिरोली जिल्हा कारागृह तसेच **अमरावती महसूल विभाग परिक्षेत्रातील** १) अमरावती मध्यवर्ती कारागृह, २)अकोला जिल्हा कारागृह, ३)यवतमाळ जिल्हा कारागृह, ४)बुलढाणा जिल्हा कारागृह व ५) वाशिम जिल्हा कारागृह ६) मोर्शी खुले कारागह या कारागृहातील बंदीस्त असलेल्या बंदयांना सन २०१९-२०२० या वित्तिय वर्षाकरिता दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कलावधीत दैनदिन आहारासाठी लागणारे **अन्नधान्य, कडधान्य, डाळी, न्याहरीचे पदार्थ, चहा, दुग्धजन्य पदार्थ, स्निंग्ध पदार्थ, मसालाचे पदार्थ, भाजीपाला, हिरवा भाजीपाला, पाव, स्वच्छताविषयक वस्तु, रुंग्ण बंदी आहार व पौष्टीक आहार अशा १४ गटनिहार्य खाद्योपयोगी व इतर वस्तुची खरेदी जाहिर ई-निविदा पध्दतीने** करावयाची आहे. तसेच गडचिरोली जिल्हा कारागृह येथे निवीदाकार प्राप्त न झाल्यास अधीक्षक चंद्रपूर जिल्हा कारागृह येथील एल-1 आलेल्या निवीदाकारांना पुरवठा करणे बंध्दनकारक राहील. याबाबत निविदाकारांनी नोंद घ्यावी.

त्याकरिता आवश्यक अटी व शर्ती तसेच निविदा फॉर्म हे **www.mahaprison.gov.in** तसेच **http://mahatenders.gov.in** या कार्यालयीन संकेतस्थळावर कार्यालयीन कामाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळात दिनांक **२७/१२/२०१८** रोजी सकाळी १२.०० ते दिनांक **०९/०१/२०१९** रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. सदर कालावधीत निविदेतील अटी व शर्तीच्या अनुषंगाने निविदाधारकास आवश्यक दस्तऐवज माहिती तसेच या कार्यालयाची निविदा फॅार्मची किंमत **प्रत्येक गटाकरीता वेगवेगळी तसेच बयाना रक्कम प्रत्येक गटाकरीता वेगवेगळी भरणा करावे लागेल (जाहीरातील नमुदप्रमाणे)**निविदेसंबधी अटी व शर्ती सोबत जोडण्यात आलेले आहेत.

कोरे निविदा फॉर्म उपलब्ध तसेच भरलेले निविदा फॉर्म स्वीकारण्याचा अंतिम दिनांक **०९/०१/२०१९** दुपारी ०३.०० वाजेपर्यत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर राहील. **नागपूर व अमरावती महसुल विभाग** परिक्षेत्रामधील ११ कारागृहासाठी प्राप्त निविदा तांत्रिक दिनांक **१४/०१/२०१९** व व्यापारी निविदा **दि.१५.०१.२०१९ रोजी कारागृह उपमहानिरीक्षणालय, पूर्व विभाग, वर्धा रोड नागपूर येथे सकाळी १०.०० वाजेपासुन उघडण्यात येतील.** इच्छुक निविदाधारकास कारागृहातील सध्या पुरवठा करण्यात येणारी प्रचलित पध्दत पहाण्यासाठी त्यांनी जवळच्या कारागृहास भेट देऊन तेथील वस्तु पुरवठयाची पध्दत यासर्व बाबीची माहिती घेऊ शकतात.

निविदाधारकाने उक्त नमुद ११ कारागृहासाठी निविदासाठी आवश्यक दस्तऐवज (तांत्रिक लिफाफा क्र-१) नागपूर / अमरावती परिक्षेत्रातील सर्व कारागृहाकरिता प्रत्येक गटाकरिता प्रत्येक कारागृहासाठी तांत्रीक बाबी गटनिहाय स्वांतत्र ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक गट निहाय दर त्यांचे दरपत्रकासाठी स्वतंत्र फॉर्म सादर करणे आवश्यक आहे.

निविदाधारकार एका कारागृहासाठी दरपत्रक (लिफाफा क्र.-२) सादर करतांना निविदा फॉर्म मध्ये नमुद १४ गटाकरिता किंवा त्यांनी निवड केलेल्या गटाकरिता त्यांचे गोपनिय दर नमुद करु शकेल मात्र एका फॉर्म करिता निविदाधारकांस या कार्यालयाची निविदा फॅार्मची **प्रत्येक गटाकरीता वेगवेगळी रक्कम भरणा करावे लागेल** व जाहिरातीत नमुद अटी व शर्तीनुसार गटनिहार्य बयाना रक्कम ही ऑनलाईन **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड सादर करणे आवश्यक आहे.

निविदाधारकाने नमुद केलेले दर जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अनुषंगाने ते वस्तुनिहाय दर स्विकृत होणार नसुन ते १४ गटनिहाय स्विकृत करण्यात येणार आहे त्यामुळे निविदाधारकाने निवड केलेल्या गटामधील सर्वच वस्तुचे दर निविदाधारकांनी स्वत: नमुद करणे अनिवार्य आहे. एकादा निविदाधारकाने त्यांनी निवड केलेल्या गटामधील एका वस्तुचे दर नमुद केले नाही तर अशा परिस्थितीत त्या कारागृहाकरिता इतर निविदाधारकाने दिलेले कमीत कमी दर निविदाधारकाने दर नमुद न केलेल्या व्यापा-यास ग्राहय धरुन सदर गटाची गणना करण्यात येईल अथवा समितीने दरपत्रक (लिफाफा क्र.२) उघडतांना ज्या निविदाधारकांनी एका कोणत्याही वस्तुचे दर नमुद न केल्याने त्याचे दरपत्रक रदद समजुन इतर व्यापा-यांस देण्याचे ठरविल्यास सदरची बाब निविदाधारकांस मान्य राहील, सदरची निविदा गटनिहार्य स्विकृत असल्याने सदर बाबतीत सर्वश्री निर्णय घेण्याचे अधिकार निविदा समिती सदस्यांना राहील.

निविदाधारकांना स्विकृत दरामध्ये खाद्योपयोगी वस्तुचा पुरवठा त्या-त्या कारागृहाच्या मुख्य द्वारापर्यत शासकिय कामाजाच्या वेळेमध्ये करावयाचा आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारची अतिरिक्त रक्कम/टॅक्स अदा केली जाणार नाही.

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **Main Portal- http://mahatenders.gov.in** वर **enroll** करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देयकर भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा **E-tender Helpdesk on** 180030702232, 07878107985, 07878107986

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची मुळ मुदतठेव पावती अथवा बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्राची सत्यप्रत ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणेसाठीच्या किंमतीचा रक्कम भरल्याची पावती व हूंडी (डी डी) ऑनलाईन **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड सादर करणे आवश्यक आहे.

४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर-२० यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५. वरील कामाची ई-निविदा **सूचना** व आवश्यकता भासल्यास मुदतवाढ नोटीस आणि निविदा उघडण्ययाचे दिनांक व ठिकाण या कारागृह विभागाच्या **www.mahaprisons.gov.in** किंवा **http://mahatenders.gov.in** या इंटरनेटवरील वेबसाईटच्या **(press Notics /Corrigendum)** मध्ये देण्यात येईल.

➢ **महाराष्ट्र शासनाच्या कारागृह खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटरांकडून खालील कामांकरिता नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत.**

| ई निविदा क्रमांक | पुरवठा करावयाचे कार्यालयाचे नाव | इसारा /बयाणा रक्कम | कामपुर्ण करण्याच्या कालावधी | ई निविदा संचाची (प्रोसेसिंग शुल्क) किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | या कारागृहातील बंदीस्त असलेल्या बंदयांना सन २०१९-२०२० करीता दैनदिन आहारासाठी लागणारे अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तुंची खरेदी | | | |
| | १) नागपूर मध्यवर्ती कारागृह | **प्रत्येक कारागृहा करिता १४ गट राहतील व प्रत्येक गटाकरीता किंमत वेगवेगळी राहील(परतावा त्या बाबतचा विवरण खाली दर्शविला आहे. )** | दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० अथवा मा.शासन /कारागृह महानिरीक्षक पुणे/कारागृह उपमहानिरीक्षक नागपूर यांनी मुदत वाढविल्यास अथवा कमी केली तो पर्यत राहील. | प्रत्येक कारागृहासाठी स्वतंत्र दरपत्रक फॉर्म सादर करावे लागेल एका कारागृहाकरिता १४ गट राहतील व **प्रत्येक गटाकरीता** फॉर्म विक्री किमत **वेगवेगळी** राहील (ना-परतावा) **त्याबाबतचा विवरण खाली दर्शिविला आहे.** |
| | २) भंडारा जिल्हा कारागृह | | | |
| | ३) चंद्रपूर जिल्हा कारागृह<br>४) गडचिरोली जि. कारागृह | | | |
| | ५) वर्धा जिल्हा कारागृह | | | |
| | ६) अमरावती म. कारागृह | | | |
| | ७) अकोला जिल्हा कारागृह<br>८) वाशिम जिल्हा कारागृह | | | |
| | ९) बुलडाणा जिल्हा कारागृह | | | |
| | १०) यवतमाळ जि. कारागृह | | | |
| | ११)मोर्शी खुले कारागृह | | | |

## कारागृहासाठी दि.०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२० या कालावधीत लागणा-या संभाव्य खाद्योपयोगी व इतर वस्तुंची यादी (क्विंटलमध्ये तथा नगामध्ये व लिटर मध्ये)

| अ. क्र | वस्तुंचे नांव | कारागृहाचे नांव | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अमरावती | अकोला | यवतमाळ | बुलडाणा | वाशिम | मोर्शी | नागपूर | चंद्रपूर | वर्धा | भंडारा | गडचिरोली |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| **गट क्रमांकः- १ (शासकीय पुरवठा)** | | | | | | | | | | | | |
| १ | गहू लोकवन (क्विं.) | 1437 | 524 | 440 | 307 | 196 | 410 | 2750 | 750 | 437 | 407 | 151 |
| २ | तांदुळ मसुरी (क्विं.) | 772 | 100 | 230 | 145 | 105 | 112 | 1500 | 400 | 224 | 213 | 42 |
| **गट क्रमांकः- २ (धान्य)** | | | | | | | | | | | | |
| १ | ज्वारी (क्विं.) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| २ | बाजरी (क्विं.) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ३ | धान्य दळण (क्विं.) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **गट क्रमांकः- ३ (कडधान्य व डाळी)** | | | | | | | | | | | | |
| १ | तुरदाळ (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 168 | 50 | 23 | 28 | 6 |
| २ | चणादाळ (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 150 | 50 | 23 | 28 | 6 |
| ३ | वाटाणा (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 104 | 50 | 12 | 28 | 6 |
| ४ | चवळी (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 104 | 50 | 12 | 28 | 6 |
| ५ | मसूर होल (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 173 | 50 | 23 | 28 | 6 |
| ६ | मुंग (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 173 | 50 | 23 | 28 | 6 |
| ७ | मटकी (क्विं.) | 70 | 26 | 25 | 13 | 13 | 15 | 162 | 50 | 23 | 28 | 6 |
| ८ | साबुदाणा (क्विं.) | 02 | 01 | 01 | 02 | 01 | 02 | 05 | 01 | 01 | 03 | 1 |
| ९ | शेंगदाणा (क्विं.) | 16 | 01 | 02 | 01 | 01 | 02 | 08 | 01 | 01 | 02 | 01 |
| १० | शेंदे मीठ (क्विं.) (उपवासाचे) | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 |
| ११ | बसेन (क्विं.) | 17 | 07 | 06 | 04 | 04 | 04 | 35 | 13 | 06 | 07 | 01 |
| १२ | मिठ आयो(क्विं.) | 50 | 19 | 17 | 12 | 08 | 10 | 100 | 30 | 17 | 17 | 04 |
| ***गट क्रमांकः- ४ (न्याहारीचे पदार्थ)*** | | | | | | | | | | | | |
| १ | रवा (क्विं.) | *190* | 70 | 70 | 61 | 29 | 30 | 210 | 105 | 63 | 53 | 10 |
| २ | पोहे जाड (क्विं.) | *70* | 26 | 25 | 30 | 13 | 15 | 160 | 50 | 23 | 22 | 04 |
| ३ | गुळभेली (क्विं.) | *50* | 18 | 17 | 30 | 08 | 10 | 100 | 40 | 16 | 17 | 03 |
| **गट क्रमांकः- ५(चहा)** | | | | | | | | | | | | |
| १ | साखर (लेवा) (क्विं.) | 104 | 32 | 30 | 20 | 14 | 15 | 175 | 50 | 30 | 29 | 06 |
| २ | चहापावडर (खुली) (क्विं.) | 22 | 08 | 08 | 05 | 03 | 04 | 44 | 13 | 07 | 07 | 02 |
| **गट क्रमांकः- ६(स्निग्ध पदार्थ)** | | | | | | | | | | | | |
| १ | गोडेतेल (सोयाबीन ) (क्विं.) | 102 | 38 | 35 | 21 | 17 | 20 | 205 | 60 | 34 | 34 | 07 |
| २ | वनस्पती तुप (क्विं.) | 23 | 09 | 08 | 03 | 04 | 05 | 50 | 16 | 08 | 08 | 03 |
| ३ | खोबरेल तेल(क्विं.) | 09 | 04 | 03 | 02 | 02 | 02 | 20 | 06 | 03 | 03 | 01 |
| **गट क्रमांकः- ७(मसाला पदार्थ)** | | | | | | | | | | | | |
| १ | जीरे (क्विं.) | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 02 | 01 | 01 | 01 | 01 |
| २ | धने (क्विं.) | 03 | 01 | 02 | 01 | 01 | 01 | 07 | 01 | 01 | 01 | 01 |
| ३ | मोहरी (क्विं.) | 05 | 02 | 02 | 01 | 01 | 01 | 10 | 04 | 01 | 02 | 01 |
| ४ | मेथीदाणा (क्विं.) | 03 | 01 | 02 | 01 | 01 | 01 | 07 | 02 | 01 | 01 | 01 |
| ५ | हिंग खडा (क्विं.) | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 03 | 01 | 01 | 01 | 01 |
| ६ | हळकुंड (क्विं.) | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 02 | 02 | 01 | 01 | 01 |
| ७ | सुखीमिरची लाल (क्विं.) | 26 | 10 | 09 | 06 | 05 | 05 | 52 | 15 | 09 | 09 | 02 |
| ८ | लसूण (क्विं.) | 03 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 07 | 02 | 01 | 01 | 01 |
| ९ | हळद पावडर (क्विं.) | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 03 | 02 | 01 | 01 | 01 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **गट क्रमांकः- ८(भाजीपाला)** | | | | | | | | | | | | |
| १ | पालेभाजी (क्विं.) | 135 | 50 | 50 | 75 | 45 | 24 | 173 | 050 | 24 | 50 | 30 |
| २ | फळभाजी (क्विं.) | 515 | 232 | 200 | 205 | 132 | 120 | 864 | 520 | 240 | 273 | 30 |
| ३ | कांदा (क्विं.) | 220 | 91 | 90 | 48 | 40 | 50 | 500 | 160 | 83 | 80 | 18 |
| ४ | बटाटा (क्विं.) | 144 | 50 | 50 | 10 | 96 | 25 | 260 | 70 | 24 | 70 | 10 |
| **गट क्रमांकः- ९(हिरवा मसाला)** | | | | | | | | | | | | |
| १ | टोमॅटो (क्विं.) | 432 | 160 | 150 | 103 | 70 | 12 | 864 | 260 | 150 | 144 | 30 |
| २ | हिरवी मिरची (क्विं.) | 15 | 06 | 05 | 04 | 02 | 03 | 30 | 10 | 03 | 05 | 01 |
| ३ | आले(अद्रक (क्विं.) | 07 | 03 | 03 | 02 | 01 | 01 | 13 | 04 | 02 | 02 | 01 |
| ४ | कोथंबीर (क्विं.) | 07 | 03 | 03 | 02 | 01 | 02 | 15 | 05 | 03 | 03 | 01 |
| ५ | कडीपत्ता (क्विं.) | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 05 | 01 | 01 | 01 | 01 |
| **गट क्रमांकः- १०(पाव)**<br>**टिपः- पाव कारागृहातील बेकरीत उत्पादीत न झाल्यास आवश्यकतेनुसार मागणी करण्यात येईल.** | | | | | | | | | | | | |
| १ | पाव (१०० ग्रॉ.वजन प्रति नग) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **गट क्रमांकः- ११( स्वच्छता विषयक वस्तू )** | | | | | | | | | | | | |
| १ | कपडे धुण्याची साबनवडी (100 ग्र. प्रति नग ) | 16000 | 7200 | 10000 | 7000 | 68000 | 2400 | 86400 | 12000 | 12000 | 6480 | 1000 |
| २ | दंतमंजन (१०० ग्रॅम. प्रति नग) | 16000 | 7200 | 10000 | 7000 | 68000 | 2400 | 86400 | 12000 | 12000 | 6480 | 1000 |
| ३ | आंघोळीची साबण (१००ग्रॅम) प्रति नग) | 16000 | 7200 | 10000 | 7000 | 68364 | 2400 | 86400 | 12000 | 12000 | 6480 | 1000 |
| ४ | शॅम्पु पाउच रु.१.००(प्रति नग) | 2000 | 3400 | 800 | 800 | 500 | --- | 4800 | 1800 | 300 | 1200 | --- |
| **गट क्रमांकः- १२ (रुग्ण बंदी आहार** | | | | | | | | | | | | |
| १ | अंडी (प्रति नग) | 18000 | 1100 | 5000 | 1000 | 500 | 6000 | 36000 | 5400 | 500 | 1800 | 1000 |
| **गट क्रमांकः- १३ (दुग्धजन्य पदार्थ)**<br>**टिपः- शासकीय दुध डेअरीतून दुधाचा पुरवठा न झाल्यास निविदाकाराकढून दुध खरेदी करण्यात येईल.** | | | | | | | | | | | | |
| १ | दुध लिटर मध्ये (अधिकृत पिशवीतुन) (३.५ तेट.५ एसएमएफ फॅट असलेले) | **75000** | **24000** | **25000** | **15400** | **10300** | **15000** | **140000** | **40000** | **21600** | **24000** | **4200** |
| **गट क्रमांकः- १४ (पौष्टीक आहार)** | | | | | | | | | | | | |
| १ | केळी(१०० ग्रॅम वजन) प्रति नग | 432000 | 154400 | 150000 | 103000 | 69000 | 75000 | 864000 | 260400 | 144000 | 136800 | 28000 |

At the sole discretion of the Tender Authority, the time schedule of the Tender stages may be extended ( MENTIONAED EARLIER )

## ➢ schedule of E-Tender

| Sr. No | Short Disciption | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Release/Publish Tender Date | 27.12.2018 | 10.00 AM |
| 2 | Bid Submission Start/ Tender Download Date | 27.12.2018 | 10.00 AM |
| 3 | Bid Submission Last Date/ Close For Technical & Commecial Bid | 09.01.2019 | 15.00 PM |
| 4 | Technical Opening Date | 14.01.2019 | 10.00 AM |
| 5 | Commecial Bid Opening Date | 15.01.2019 | 10.00 AM |

## कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपूर(कारागृह निहाय फॉर्म फी आणि बयाणा रक्कम खालील प्रमाणे )
## नागपूर महसूल विभाग ,नागपूर /अमरावती महसूल विभाग, अमरावती

| कारागृहाचे नांव | रक्कम | गट क्र.१ | गट क्र.२ | गट क्र.३ | गट क्र.४ | गट क्र.५ | गट क्र.६ | गट क्र.७ | गट क्र.८ | गट क्र.९ | गट क्र.१० | गट क्र.११ | गट क्र.१२ | गट क्र.१३ | गट क्र.१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागपूर म.का | फॉर्म फी रु. | १३००० | ११०० | १३००० | ३९०० | ३९०० | ३९०० | ३९०० | ३९०० | ३९०० | ११०० | २६०० | १३०० | १३००० | ३९०० |
| | बयाणा रु. | १३०००० | ५५०० | १३०००० | ६५००० | ६५००० | ६५००० | ६५००० | ६५००० | ६५००० | ५५०० | १३००० | ६५०० | १३०००० | ६५००० |
| भंडारा जि.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | ३९०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | २६०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | ६५००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | १३००० |
| वर्धा जि.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | ३९०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | ६५००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० |
| चंद्रपूर जि.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | ३९०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० | २६०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | ३९०० | १३०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | ६५००० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० | १३००० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | ६५००० | ६५०० |
| गडचिरोली खुले | फॉर्म फी रु. | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० | ११०० |
| | बयाणा रु. | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० | ५५०० |
| अमरावती म.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | ३९०० | २६०० | २६०० | ३९०० | १३०० | ३९०० | २६०० | ११०० | २६०० | १३०० | ३९०० | २६०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | ६५००० | १३००० | १३००० | ६५००० | ६५०० | ६५००० | १३००० | ५५०० | १३००० | ६५०० | ६५००० | १३००० |
| अकोला जि.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | ३९०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | ६५००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | १२००० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० |
| वाशिम जि.का. | फॉर्म फी रु. | २६०० | ११०० | २६०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० |
| | बयाणा रु. | १३००० | ५५०० | १३००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० |
| यवतमाळ जि.का | फॉर्म फी रु. | २६०० | ११०० | २६०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० |
| | बयाणा रु. | १३००० | ५५०० | १३००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० |
| बुलडाणा जि.का. | फॉर्म फी रु. | ३९०० | ११०० | २६०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | २६०० | १३०० |
| | बयाणा रु. | ६५००० | ५५०० | १३००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | १३००० | ६५०० |
| मोर्शी खुले का. | फॉर्म फी रु. | २६०० | ११०० | २६०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० | ११०० | १३०० | १३०० | १३०० | १३०० |
| | बयाणा रु. | १३००० | ५५०० | १३००० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ५५०० | ६५०० | ६५०० | ६५०० | ६५०० |

## तांत्रिक बाबी:-

| अ.क्र. | प्रमाणपत्र | कागदपत्रे दस्तऐवज |
|---|---|---|
| 1 | संस्थेचा नोंदणी क्रमाक (shop Act Licence) | व्यापारी घटक असल्यास शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र (दुकान नोंदणी प्रमाणपत्र )अद्यावत असणे आवश्यक आहे किंवा सहकारी संस्था असल्यास (By Laws) ची प्रत जोडणे आवश्यक आहे किंवा ज्या ठिकाणी शॉप ॲक्ट नाही. त्या गांवातील ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र सदर करणे आवश्यक आहे. |
| 2 | GST Registration Certificate | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अंक 81(8) गुरुवार दि.29 जुन 2017 नुसार महाराष्ट्र वस्तू व सेवा करविषयक कायदे (सुधारणा विधिग्राहिकरण व व्यावृत्ती ) अधिनियम-2017 राज्यात दि.1 जुलै- 2017 GST कर लागू झाल्याने संस्थेचे GST नोंदणी क्रमांक असलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे. **तसचे GST भरणा केल्याबाबतचे माहे सप्टेबर-2018 पर्यत प्रमाणपत्र सादर करण्यात यावे**. |
| 3 | आयकर प्रमाणपत्र | निविदाकाराने सन 2018-2019 सालातील (Assmt Year 2018-19) चे आयकर विवरण (Income Tax Retum) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे किंवा आयकर भरण्यात सुट असल्यास तसे आयकर विभागाचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| 4 | ओळखपत्र | ओळखपत्र म्हणून आधारकार्ड /ड्रायव्हिंग लायसन्स /मतदार ओळखपत्र /पॅन कार्ड या पैकी एक सादर करणे आवश्यक आहे. |
| 5 | मागील 3 वर्षाचे नफा तोटा आणि ताळेंबद | निविदाकाराने लेखा परिक्षण झालेल्या गेल्या तीन वर्षाचे ताळेबंद (Blance Sheet) व(Profit and Loss A/C)लेखे Chartered Accountant यांनी प्रमाणित केलेल्या निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. |
| 6 | सॉलव्हन्सी (तहसिलदार) किंवा बॅक गॉरंटी | **महसूल विभागाच्या तहसिलदार किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिका-याने दिलेले पतदारी (सॉलव्हन्सी)** प्रमाणपत्र कमीत कमी रक्कम रुपये 3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) पर्यतचे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र हे ज्या दिवशी निविदा उघडणार आहे त्या तारखेपर्यत ग्राहय असणे आवश्यक आहे. तसेच सदरचे प्रमाणपत्र हे फर्मच्या नावाने किंवा फर्मच्या मालकाच्या नावाने असणे आवश्यक आहे. **किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचे रु.3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) पर्यतची बॅक गॅरंटी सादर करावी**. |
| 7 | अन्न व औषधे विभागाचे अद्यावत प्रमाणपत्र | निविदाकाराने निविदेसोबत अन्न व औषधे विभगाचे दिलेले अद्यावत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| 8 | सुक्ष्म व लधु.मध्यम उद्योग यांनी दिलेले अद्यावत प्रमाणपत्र | निविदाकाराने निविदेसोबत सुक्ष्म व लधु.मध्यम उद्योग या संस्थेचे अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.(सदर संस्थेने उत्पादन करुन विक्री केलेले वस्तूच ग्राहय धरण्यात येईल) |
| 9 | | उक्त नमुद 1 ते 8 मधील आवश्यक **दस्तऐवज PDF करुन** **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड कराण्यात यावे. |

## ➢ निविदेबाबत अटी व शर्ती :-

१. सन २०१९-२०२० या वित्तिय वर्षाकरिता दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या कालावधीत कारागृहात बंदीस्त बंदयाकरिता लागणारे अन्नधान्य व इतर खाद्यापयोगी वस्तुची ई-निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर निविदा ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाची आहे.

२. नागपूर व अमरावती महसुल विभागात कार्यान्वीत कारागृहासाठी आवश्यक असणारे दस्ताऐवज (तांत्रिक बाबी लिफाफा क्र. १) एकाच वेळेस भरावयाचे आहे मात्र कारागृह निहार्य स्वतंत्र दरपत्रके सादर करावयाची असल्याने प्रत्येक कारागृहासाठी दरपत्रक फॉर्मसाठी या कार्यालयाची प्रोसेसिंग शुल्क **प्रत्येक गटाकरीता वेगवेगळी** राहिल, व एक दरपत्रक फॉर्म फक्त एकाच कारागृहासाठी वापरता येईल इतर कारागृहासाठी निविदा सादर करावयाची असल्यास वेगळा दरपत्रक फॉर्म घ्यावे लागेल.

३. निविदा फॉर्म विक्री (प्रोसेसिंग शुल्क ) **प्रत्येक गटाकरीता वेगवेगळी** राहील यामध्ये ई-निविदा शुल्काचा समावेश राहणार नाही तो निविदाधारकास वेगळा अदा करावा लागेल.

४. निविदा फॉर्म विक्रि रक्कम ही ना-परतावा स्वरुपाची असेल तसेच बयाना रक्कम ही परतावा स्वरुपाची राहील.

५. बयाना रक्कम परतावा स्वरुपाची असल्याने ज्या निविदाधारकांचे गटनिहाय दर स्विकृत झाल्यास त्यांचा करारनामा संपुष्ठात आल्यानंतर त्यांना परत करण्यात येईल तसेच ज्या निविदाधारकांचे गटनिहाय दर स्विकृत न झाल्यास त्यांना दरस्विकृती आदेश निर्गमित झाल्या पासुन ६ महिन्याच्या कालावधीनंतर त्यांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने परत करण्यात येईल सदर रक्कमेवर या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

६. निविदा फॉर्म विक्री व बयाना रक्कम ही ऑनलाईन **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

७. एका फर्मने/कंपनीने/निविदाकाराने एका कारागृहासाठी फक्त एकच निविदा सादर करावी. संयुक्त सादर करुन नये. तसेच निविदेकार एका फॉर्म वर एका कारागृहासाठी गट क्र. १ ते १४ मधील सर्व गट किंवा निविदेकारांस आवश्यक असलेला गट इच्छेनुसार सादर करु शकेल.

८. ई-निविदा प्रकियेमध्ये निविदाधारकाचे दर वस्तुनिहार्य स्विकृत करण्यात येणार नसुन उक्त नमुद १४ गटनिहार्य स्विकृत होणार आहे. त्यामुळे निवड केलेल्या गटामधील सर्वच वस्तुचे दर निविदाधारकांना नमुद करणे बंधनकारक राहील.

९. ई-निविदा फॉर्म हे **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक **२७/१२/२०१८** (सकाळी १०.०० पासुन ) **ते ०९/०१/२०१९** (दुपारी १५.०० वाजेपर्यत) कार्यालयीन कामाचे दिवशी डाऊनलोड तसेच पुर्णतः भरणेकामी उपलब्ध होतील. सदर कालावधीत आपणांस लिफाफा क्र १ व २ ची अटी व शर्तीच्या अनुषंगाने पूर्तता करावी लागेल.

१०. बयाना रक्कम खालील तक्त्याप्रमाणे गट निहाय असेल व ती बयाना रक्कम तसेच प्रोसेसिंग शुल्क रक्कम ही ऑनलाईन **http://mahatenders.giv.in** संकेतस्थळावर अपलोड सादर करणे आवश्यक आहे

११. बयाना रक्कम तसेच निविदा फॉर्म विक्री रक्कम न भरलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही.

१२. नागपूर व अमरावती महसुल विभाग परिक्षेत्रातील तांत्रिक दिनांक **१४/०१/२०१९** व व्यापारी निविदा **दि.१५.०१.२०१९** रोजी सकाळी १०.०० वाजता पासुन शासनाच्या तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया करिता गठीत केलेल्या समितीद्वारे **कारागृह उपमहानिरीक्षणालय, पूर्व विभाग, नागपूर** येथे उघडण्यात येतील. सदर वेळी निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना हजर राहतील.

१३. सिलबंद प्राप्त झालेल्या निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समिती व कारागृह उपमहानिरीक्षक,पुर्व विभाग,नागपूर यांचेकडे राखुन ठेवले आहेत.

१४. कारागृहास पुरवठा करण्यात येणा-या खाद्योपयोगी वस्तु व अन्न-धान्यामध्ये भेसळ नसावी व वस्तुचा पुरवठा निविदाकाराने कारागृहाचे मुख्य प्रवेशद्वारापर्यत करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील व त्याबाबत कोणताही जादा आकार दिला जाणार नाही.

१५. शासकीय गोदामातुन गहु,तांदुळ, खाद्यतेल व कडधान्य तसेच ज्या प्रमाणात कारागृहाचे बगीच्यातुन फळभाजी,पालेभाजी इत्यादी वस्तु उपलब्ध होतील तसेच नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह येथून दंतमंजन व आंघोळीचे साबनाचा पुरवठा न झाल्यास आवश्यक वस्तुची खरेदी निविदाकाराकडून करण्यात येईल.

१६. खाद्यवस्तू हलक्या दर्जाच्या व खाण्यास अयोग्य असल्यास त्या नाकारण्याचे अधिकार संबधित कारागृह अधिक्षक/ संबधित कारागृहाचे वैद्यकीय अधिकारी यांना आहेत. नाकारलेल्या वस्तू बदलवून देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील व पुरवठादाराने नुकसान झाल्यास कारागृह प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१७. निविदाकार पुरवित असलेला माल भेसळयुक्त आहे असे निदर्शनास आल्यास आणि तसे सिध्द झाल्यास निविदेकारास भेसळ प्रतिबंधक कायदयामध्ये आलेल्या तरतुदीस तोड दयावे लागेल या नियमाच्याउल्लंघनाबाबत दंड अथवा शिक्षेबाबतचे निर्णय होईल. यांची संपूर्ण जबाबदारी ही निविदेकारांवर राहील.

१८. मालाविषयी काही शंका उत्पन्न झाल्यास व आवश्यकता वाटल्यास संबंधीत कारागृह अधीक्षक किंवा वैद्यकीय अधिकारी/ विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांनी नेमलेले कारागृह अधिकारी / कर्मचारी यांना मालाचा नमुना घेवून शासकिय प्रयोगशाळेत पाठविण्याचा अधिकार असेल व त्याबाबतचा खर्च निविदेकारांच्या बिलातुन एकरक्कमी वसुल केला जाईल व हे निविदेकारांस बंधनकारक राहील.

१९. पुरवठा केलेल्या वस्तुचा नमुना तपासणीचा अहवाल अप्राप्त असल्यास पुरवठा केलेल्या साहित्याची देयके प्रलंबित ठेवली जातील व निर्णयानंतरच त्यावर कार्यवाही केली जाईल.

२०. मालाचा पुरवठा केला नाही किंवा मागणी केलेला माल योग्य त्या मुदतीत पुरविण्यात आला नाही. किंवा बदलुन दिला नाही. तर तेवढा माल बाहेरुन स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी केला जाईल. आणि अशा वेळी मंजूर केलेले निविदाधारकांचे दर व स्थानिक बाजारातील दर यामधील असलेली जादा तफावतीची येणारी रक्कम ही निविदेकारांचे देयकातुन एकरक्कमी परस्पर वसुल केली जाईल.

२१. ज्या निविदेकारांचे दर स्विकृत (कंत्राट) केले आहे. त्याच निविदाधारकांस मागणीनुसार पुरवठयाचे काम करावे लागेल त्यांना सदरचा कंत्रात खाजगी विक्रेत्याला किंवा इतर व्यापा-यांस हस्तांतरीत करता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास त्यास काळया यादीत घोषीत करण्यात येईल व याची जबाबदारी स्विकृत निविदाधारकाची राहील.

२२. निविदाकार आपआपसात संगनमत करीत आहे किंवा केले आहे असे जर निविदा समितीच्या लक्षात आले तर निविदा समितीने वेळेवर घेतलेला निर्णय सर्व निविदाकारांना बंधनकारक राहील.

२३. खाद्योपयोगी वस्तुंचा पुरवठा करणा-या निविदाकाराने किंवा संस्थेने कारागृह अधिक्षकांनी मागणी केलेल्या गटनिहाय अन्न-धान्य व इतर वस्तुचा पुरवठा मागणी केल्याचे दिनांकापासुन ०७ दिवसाचे आत करावयाचा आहे. नाशिवंत वस्तुची मागणी केल्यास २४ तासात पुरवठा करावयाचा आहे. विहित वेळेत पुरवठा न केल्यास अथवा पुरवठा बंद केल्यास आदेशीत मालाचा रक्कमेच्या **२ %** प्रति दिवस प्रमाणे विलंब झालेल्या कालावधीकरीता दंड आकारण्यात येईल.

२४. निविदेकारास माल पुरवठा केल्यानंतर ०७ दिवसाच्या आत त्याबाबतचे देयक संबंधीत कारागृहास सादर करणे बंधकारक राहील.

२५. निविदेमध्ये पुरवठा करण्यात येणा-या वस्तुचे दर प्रति क्विंटल/नग/लिटरमध्येच नमुद करणे बंधकारक राहील त्याचप्रमाणे नमुद केलेले दर निविदा उघडतेवेळी निविदेकारांनी प्रति क्विंटल/ नग/ लिटर मध्ये नमूद केलेले असल्याचे समजण्यात येईल.

२६. प्रत्येक कारागृहासाठी आवश्यक खरेदी करावयाच्या वस्तूंचे १४ प्रकारचे गट तयार करण्यात आलेले आहेत. व १४ प्रकारच्या गटासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत. परिशिष्टातील गट क्र.१ ते १४ मधील सर्वच वस्तुचे दर नमुद करणे बंधकारक असुन त्या वस्तुसाठी **१००%** दर देणे बंधनकारक आहे.असे दर न दिल्यास निविदा अग्राहय ठरविण्यात येईल.

२७. प्राप्त झालेल्या निविदानुसार गटनिहाय सर्व वस्तुच्या जाहीरातील आवश्यक प्रमाण व निविदेकाराचे नमुद किंमतीनुसार एकुण बेरीज केल्यानंतर गटनिहाय वस्तुची सर्वात कमी बेरीज ज्या निविदाकारांची असेल त्यांना एल-१ घोषीत करुन दर स्विकृतीस मंजुरी दिल्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. एकदा समितीचे स्विकृत केलेले दर निविदेच्या अंतिम दिनांकापर्यंत अमलात राहतील.

२८. धान्याची निविदा ही गटनिहाय पध्दतीने करणेची पध्दत असली तरी एखादया गटामध्ये दिलेले वस्तु/धान्य हे सर्वात कमी असल्यास गट मंजुर केला नाही तर त्या गटामध्ये विशिष्ट धान्य/वस्तु याला मान्यता देण्यास अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील व त्याप्रमाणे मान्यताप्राप्त कत्राटदारास तो दर बंधनकारक राहील याबाबत समितीचा निर्णय अंतिम राहील.

२९. दुध हे दैनंदिन लागणारी व नाशिवंत वस्तु असल्याने फक्त दुधाची स्वतंत्र निविदा राहील.शासकीय दुग्धशाळा, जिल्हा दुग्ध उत्पादन संघ व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी व खाजगी दुग्ध पुरवठादार हे निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेऊ शकतील शासन निर्णय क्र. जेएएलएम-१५१०/प्र.क्र.५३/पीआरएस-२ दिनांक १५.०७.२०११ अन्वये शासकीय दुध योजना यांना प्राधान्य देण्यात येईल. ज्या ठिकाणी शासकीय दुधाचा पुरवठा अधिकृत पिशवीमधुनच करावा लागेल. खुले दुध स्विकारल्या जाणार नाही. दुधामध्ये ३.५ फॅट ८.५ एस.एम.एफ. इतके फॅट असणे आवश्यक आहे.(**टिप:- शासनाने सन २०१९-२० मध्ये दुधास दरवाढ दिली तरी सदर आर्थिक वर्षात पुरवठादाराने निविदा करतांना नमुद केलेले दरच देय राहतील दर वाढवून दिले जाणार नाहीत. )**

३०. कारागृहाकडे स्वतःच्या मालकीचे आटा चक्की उपलब्ध आहे. परंतु सदरची चक्की नादुरुस्त झाल्यांस किंवा आवश्यकतेपेक्षा कमी धान्य दळण उपलब्ध होत असल्यास मागणी नुसार कारागृहाकडे उपलब्ध गव्हातुन धान्य दळण मागणी संबंधीत पुरवठादारकडे करण्यात येईल.

३१. गोडे तेल सोयाबीन, खोबरेल तेल व वनस्पती तुप इत्यादी वस्तु या १५ किलोच्या कंपनी पॅक डब्यामधुन पुरवठा करावा लागतील. या वस्तुंच्या किंमतीमध्ये डब्यांच्य किंमती समाविष्ट असल्यामुळे रिकामे डबे परत मिळणार नाहीत. परंतु निविदाकाराने १५ किलो डब्याचाच दर नमुद न करता प्रति क्विंटलचा दर नमुद करावा.

**३२. खाद्यतेल यांचा पुरवठा करतेवेळी गोडेतेल (सोयाबीन) / वनस्पती तुप हे ॲगमार्क किंवा आय.एस.आय. मानक दर्जाचे असावे तसेच मिठ/बेसन/खोबरेलतेल हे कोणत्या कंपनीचे / बॅंडचे आहे स्पष्ट करणे आवश्यक आहे. लोकल पॅकीगचे डब्बे स्विकारण्यात येणार नाहीत.**

३३. चहाचा पुरवठा करतांना निविदेमध्ये जे दर दिले जातात ते ममरी/गोळी **(Grainy)** स्वरुपाचा असणे आश्यक आहे तसेच तो कोणत्या ब्रॅडचा आहे ही बाब नमुद करणे आवश्यक आहे.

३४. निविदा स्विकृत झाल्यास (४.६ मधील अटी) पुरवठादारास प्रत्येक गटातील प्रत्येक वस्तुची वर्षभरासाठी लागणा-या प्रमाणनुसार किंमत काढण्यात येईल आणि अशा प्रकारे प्रत्येक गटासाठी किंमत काढल्यानंतर त्या त्या गटाच्या वस्तुचा वर्षभरातील पुरवठयासाठी होणा-या रक्कमेच्या **३%** रक्कम सुरक्षा रक्कम म्हणुन अठरा (१८) महीण्यासाठीच्या बॅंक गॅरंटीच्या स्वरुपात संबंधीत कारागृहाकडे जमा करुन द्यावी लागेल.

३५. गहू, ज्वारी, तांदुळ, कडधान्य व साखर यांच्या पोत्याची (बारदाना) संबधित कारागृह अधिक्षकांकडून परत करण्यात येतील. त्यामुळे बारदान्यांकरीता वेगळी किंमत आकारता येणार नाही.

३६. निविदाकाराने सन २०१८-२०१९ वर्षातील आयकर व विक्रीकर/व्हॅट भरल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

३७. निविदाकार / संस्थांनी त्यांचे मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण / तळेबंद अहवाल सादर करावेत. फळभाजी / पालेभाजी यासाठी कोणत्याही प्रकारचे आयकर ,विक्रीकर, व्हॅट भरणेबाबत सुट असल्यास तसे सक्षम प्राधिका-यांचे पत्र सोबत जोडणे आवश्यक राहील.

३८. दि.१ जुलै **२०१७ पासुन जी.एस.टी भरल्याचे व नोदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (तसचे जी.एस.टी.भरल्याचे माहे सप्टेंबर-२०१८ पर्यत भरणा केल्याबाबत पावती सोबत सादर करावी.)**

३९. जे निविदाकार तात्रिक बाबीची पुर्तता करणार नाहीत त्यांच्या व्यापारी निविदा उघडण्यात येणार नाहीत.

४०. वर्षभराच्या कालावधीत बंद्याच्या संस्थेतील फरकामुळे **१०%** ते २० **%** कमी जास्त खरेदी होण्याची शक्यता पुरवठादाराने गृहित धरावी.

४१. निविदाकाराने सर्व करासह,अनुषंगिक खर्च **(Incidential Cost)** व वाहतुक खर्च यासह त्यांचे दर नमुद करणे आवश्यक आहे.

४२. नोदणीकृत महिला संघटना /संस्था यांना निविदा अंतिम करतांना खालीलप्रमाणे प्राधान्य देण्यात येईल. नोंदणीकृत महिला संस्था, महिला व बाल कल्याण विभागाच्या कामधेनु योजनेच्या सर्व अटी पुर्ण करीत असल्यास व निम्नतम दर दिलेले असल्यास त्यांच्या क्षमतेप्रमाणे त्यांना पुरवठा करण्याचे काम देण्यात येईल. मात्र त्यांना या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.

४३. दर स्विकृत निविदाकारास मालाचा पुरवठा करतांना गुलाबी, पिवळा, पांढरा अशा तीन रंगाच्या कागदावर चलन तयार करणे आवश्यक राहील. **गुलाबी रंगाचे चलन कारागृहाकडे देण्यात यावे. पिवळया रंगाचे चलन देयक सादर करतांना त्यास जोडणे आवश्यक राहील. व पांढ-या रंगाने चलन पुरवठादाराकडे राहील.** या पावतीवर कारागृहाचे नांव, पुरवठयाचा दिनांक, वाहनाचा नोंदणी क्रमांक व ज्या व्यक्तीसोबत वस्तु पाठविल्या त्याचे नाव असणे आवश्यक राहील.

४४. निविदेमध्ये काही वाद निर्माण झाल्यास त्याचा निर्णय घेण्याचा अधिकार निविदा समितीला राहील. तसेच सदर जाहीरात प्रसिध्दी करतांना त्यामध्ये तांत्रिक उणिवा राहील्यास त्यासाठी कोणाला कोठेही दाद मागता येणार नाही. यासंबंधी समितीचे घेतलेला निर्णय अंतिम राहील.

४५. निविदा दर स्विकृतीचा कालावधी दि.१.४.२०१९ ते ३१.३.२०२० या (१२) बारा महिण्यासाठी अथवा शासन कारागृह महानिरीक्षक,पुणे/कारागृह उपमहानिरीक्षक,नागपूर यांनी मुदत वाढविल्यास अथवा कमी केली तो पर्यत राहील.

४६. निविदा मंजुर झाल्यापासुन दिनांक ३१/०३/२०२० पर्यतच्या कालावधीसाठी किंवा त्या अगोदर अन्य कारणाने रद्द करावी लागेल त्या कालावधीपर्यत वैध राहील. निविदा उघडण्यात आल्यानंतर त्यामध्ये नमुद केलेले दर निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन ६ महिन्याच्या कालावधीपुरतेच स्विकृतीसाठी वैध राहतील. निविदा उघडलेल्या दिनांकापासुन जर ६ महिन्याचे आत निविदा स्विकृती मंजुरी दिली नाही तर निविदा प्रक्रिया रद्द झाली असे समजण्यात येईल.

४७. ज्या निविदाकाराचे दर स्विकृत केल्या जातील त्यांना या कार्यालयाकडून कळविण्यात येईल आणि त्यांनी कारागृहाचे मागणीनुसार पुरवठा करण्यापुर्वी रु.१००/- च्या बॉड पेपरवर संबंधित कारागृह अधिक्षकांशी करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच निविदाकाराचे दर न्युनतम आले तरी पूर्वानुभव विचारात घेवून त्यांची निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत निविदा समितीचे घेतलेला निर्णय अंतीम राहील.

४८. निविदा उघडण्याच्या दिनांकास स्थानिक बाजारभावाशी तुलनात्मकदृष्टया तुलना विचारात घेतांना निविदेमध्ये प्राप्त झालेले दर सरासरीने जास्त वाटत असतील तर समिती दरामध्ये वाटाघाटी करण्याच्या मतापर्यत आल्यास वाटाघाटीसाठी निविदाकारास सहमत राहावे लागेल.

४९. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.28/2015/विनियम/ दिनांक.25.जुन 2015 व उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दिनांक 01 डिसेंबर-2016 मधील 6.8 परिशिष्ट-8(1) सुक्ष्म व लधु उत्पादन उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सुट देण्यात आली आहे. शासकीय मंडळ/ महामंडळ/ उपक्रमांना तसेच सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच महाराष्ट शासन रोजगार व स्वयंरोजगार विभागशासन निर्णय क्रमांक रोस्वरी-2002/प्र.क्र.267 दिनांक 17 ऑगस्ट-2002 अन्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना अमानत रक्कम भरण्यापासून सुट अट क्र.8 अन्वये सुट देण्यात आली आहे.

सदर निविदा प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या पुरवठा दाराच्या पुरवठयावर शासनाने/अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच कारागृह उपमहानिरीक्षक पूर्व विभाग, पश्चिम विभाग, दक्षिण विभाग व मध्य विभागाने त्याच्या पुरवठाबाबत काळया यादीत किंवा पुरवठावर बंदी घातलेली असेल त्या निविदाधारकांनी सदर निविदा प्रक्रियेत भाग घेऊ नये. सदरची बाब निदर्शनास आल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल किंवा निविदा दर स्विकृत झाल्यानंतर सुध्दा त्यांच्या पुरवठावर बंदी घालण्याबाबतचे सर्व अधिकार कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांना राहील.

५०. याबाबत वर नमुद केलेल्या नियमाचे उल्लंघन संबंधिताकडून झाल्यास संबंधित निविदाधारकास जबाबदार धरण्यात येईल. पुरवठा धारकांना विहीत कालावधीपर्यंत पुरवठा करावा लागेल. मध्येच पुरवठा बंद केल्यास त्यांची निविदापोटी दिलेल्या पतवारी प्रमाणपत्रावर कायदेशीर कार्यवाहीकरुन सुरक्षाठेव रक्कम व अमानत ठेव रक्कम शासन जमा करण्यात येईल. तसेच यापुढे त्यांना कारागृह विभागातील निविदेत भाग घेता येणार नाही. त्याचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल व इतर शासकिय/ निमशासकिय संस्थेमधील निविदेत भाग घेता येणार नाही. याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सादर करुन काळया यादीत प्रस्तावित करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे निविदेकारांनी भेसळयुक्त / निम्मदर्जाच्या मालाचा पुरवठा केल्यास वरीलप्रमाणे कारवाई करुन अन्न सुरक्षा व मानदे अधिनियमातील प्रचलित नियमान्वये अन्न पदार्थ विक्री करणे, वितरण करणे व साठवणे इत्यादीचे परवाने रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

५१. या कार्यालयाकडुन स्विकृत निविदाधारकारास भेसळयुक्त वस्तुचा पुरवठा करीत असल्याचे निदर्शनास आले किंवा अन्न व औषधी तपासणी कार्यालयाकडुन तसे सिध्द झाल्यास संबंधीतास कोणतेही सुचना/नोटीस किंवा संधी न देता त्यांच्या पुरवठावर कायमस्वरुपी बंदी/काळया यादीत घोर्षीत करण्याचे अधीकार कारागृह उपमहानिरीक्षक पूर्व विभाग, नागपूर यांचेकडे राहतील अशा निविदाधारकास दंडात्मक रित्या त्यांनी जमा केलेली बयाना रक्कम तसेच कारागृहाकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम तसेच पुरवठा बंद करण्याच्या आदेशापासुन सदर निविदा संपुष्ठात येईल पावेतो म्हणजेच दिनांक ३१.०३.२०२० रोजी पावेतो स्थानिक दर किंवा इतर व्यापा-याच्या दरामध्ये खरेदी केलेल्या वस्तुच्या किमतीमधील तफावतीची रक्कम संबंधीत पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल व याची सर्व जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची राहील.

**५२.** परिस्थितीनुसार नविन अटी घालण्याचे किंवा सुधारणा करण्याचे **तसेच कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबत पुर्ण अधिकार कारागृह उपमहानिरीक्षक व समितीस राहतील.**

**(योगेश देसाई)**
कारागृह उपमहानिरीक्षक,
पुर्व विभाग,नागपूर

Signature Not Verified
Digitally signed by Yogesh Dattataray Desai
Date: 2018.12.26 17:56:40 IST
Location: Maharashtra